शुक्रवार, ३१ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १६४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## कोरोना रुग्णवाढ : महाराष्ट्रासह आठ राज्यांना विशेष निर्देश



**मुंबई** : देशात कोरोना संसर्गाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वाधिक कोरोना रुग्ण आढळणाऱ्या आठ राज्यांना विशेष निर्देश दिले आहेत. यात महाराष्ट्राचाही समावेश आहे. केंद्राने आठ राज्यांना तयारी बळकट करण्यास आणि लसीकरणाची व्याप्ती वाढवण्यास सांगितले आहे. केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी दिल्ली, हरियाणा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि झारखंड या राज्यांसाठी पत्र लिहून कोविड-१९ चाचण्या वाढवण्याचा, रुग्णालय स्तरावरील तयारी मजबूत करण्याचा, लसीकरणाचा वेग आणि व्याप्ती वाढवण्याचा सल्ला दिला आहे. कोरोनाच्या रुग्णांमध्ये अचानक झालेली वाढ पाहता केंद्राने या राज्यांना पत्र लिहून सतर्क करीत तातडीने उपाययोजना करण्याचे सूचित केले आहे.

### अंतरंग

लहान मुलांच्या लसीकरणासाठी पनवेल मनपाची जय्यत तयारी/२
खालापुरात अल्पवयीन मुलीची प्रसूती; नराधमाविरोधात गुन्हा/५
पहिल्या कसोटीत द. आफ्रिकेवर भारताचा ऐतिहासिक विजय/६

# 'थर्टी फर्स्ट' आणि नववर्ष स्वागतासाठी रायगड हाऊसफुल्ल!

**अलिबाग : प्रतिनिधी**

३१ डिसेंबर आणि १ जानेवारी रोजीच्या नववर्ष स्वागतासाठी रायगड जिल्ह्यातील हॉटेल्स आणि कॉटेजेस फुल्ल झाली आहेत. दुसरीकडे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीसही सज्ज झाले आहेत. बेकायदा पार्ट्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार असून नियमांचा भंग करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार आहे.



अलिकडच्या काळात गोव्यापाठोपाठ रायगडातील अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, माथेरान ही पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी फेव्हरेट डेस्टिनेशन बनली आहेत. नाताळचा सण आणि लागून आलेल्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल झालेले आहेत. आता थर्टी फर्स्ट सेलिब्रेशन आणि नववर्षाचे स्वागत केले जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटनस्थळे विशेषत: समुद्रकिनारे सध्या गजबजले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणा अनुचित प्रकार घडू नये याकरिता सतर्क झालेली आहे.

### प्रशासन, पोलीस यंत्रणाही सज्ज

शासनाने ३१ डिसेंबर व १ जानेवारीसाठी नियमावली जारी केली आहे. प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी केली जात आहे. पोलिसांनीही पर्यटन व्यावसायिक, हॉटेल, लॉजेस, कॉटेज मालकांच्या बैठका घेऊन सूचना केल्या आहेत. याशिवाय ठिकठिकाणी पोलीस पथके तैनात असतील.



### कोरोनासह ओमायक्रॉनचे सावट

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मागील वर्षी थर्टी फर्स्ट आणि नववर्ष स्वागत कार्यक्रमांवर बंदी होती. यंदा आधी तशी परिस्थिती नव्हती. त्यामुळे बुकिंग मोठ्या प्रमाणात झाले असताना पुन्हा एकदा कोरोनाने डोके वर काढले आहे. त्याचबरोबर ओमायक्रॉनचाही प्रादुर्भाव होत आहे. त्यामुळे जमावबंदीसह अन्य निर्बंध लागू झाले आहेत. परिणामी पर्यटकांच्या हौसेवर विरजण पडले आहे.

### कोट्यवधींचा कर्नाळा बँक घोटाळा

# ८५ आरोपींविरुद्ध पुरावा गोळा करण्याचे काम सुरू

## गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांची माहिती

**मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा नागरी सहकारी बँक घोटाळ्यातील ८५ आरोपींविरुद्ध पुरावा गोळा करण्याचे काम सुरू असल्याची माहिती राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी लक्षवेधी सूचनेला दिलेल्या लेखी उत्तरात दिली आहे.

पनवेल येथील कर्नाळा बँकेच्या अध्यक्ष व संचालकांनी हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे उघडकीस आले आहे. बँकेतील या घोटाळ्याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था अलिबाग, जि. रायगड यांनी १७ फेब्रुवारी २०२० रोजी गुन्हा दाखल झाला आहे. बऱ्याच कालावधीनंतर बँकेच्या अध्यक्षांच्या स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करून अध्यक्षांना अटक होऊन जवळपास चार ते पाच महिन्यांचा कालावधी उलटूनसुद्धा बँकेच्या खातेदारांना आपली आयुष्याची पुंजी म्हणून बँकेत ठेवलेली रक्कम परत देण्यासाठी व्यवस्थापनाकडून असमर्थता दर्शविली जात आहे. बँकेतील या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष




सहभागी असलेल्या संचालक व अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झाली नाही. त्यामुळे खातेदार व ठेवीदारांमध्ये शासनाविरोधात चिड निर्माण झालेली असून खातेदार व ठेवीदारांना बँकेतील त्यांच्या ठेवी तातडीने परत मिळण्यासाठी तसेच या गैरव्यवहारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या संचालक व अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई काय केली, अशी लक्षवेधी सूचना आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मुंबई येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात दाखल केली होती.

या लक्षवेधीवर गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, रिझर्व्ह बँकेचे उपमुख्य कार्यकारी

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

अधिकारी यांनी कर्नाळा नागरी सहकारी बँक, पनवेल यांच्या ३१ मार्च २०१८ रोजी केलेल्या तपासणीत बँकेने मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणामध्ये गंभीर आक्षेप निदर्शनास आल्यामुळे २२ एप्रिल २०१९ रोजी बँकेच्या कर्ज व्यवहाराचे विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांना कळविले होते. **(पान २ वर..)**

### आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नातून

# कोन-सावळे रस्त्याचे होणार काँक्रिटीकरण

**केंद्रीय रस्ते विकास निधीतून कामाचा उद्या शुभारंभ**

**चालक आणि प्रवाशांना नववर्षाची सुखद भेट!**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे दमदार आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नाने केंद्रीय रस्ते विकास निधी अंतर्गत कोन-सावळे रस्ता काँक्रिटीकरणासाठी २० कोटी रुपये मंजूर झाले असून या कामाचे भूमिपूजन शनिवारी (दि. १ जानेवारी) सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

सोमाटणे पेट्रोलपंप या ठिकाणी हा सोहळा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष व पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते होणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून उरण विधानसभा मतदारसंघात येणारा कोन-सावळे रस्ता अत्यंत खराब झाला असून वाहनचालक व प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. राज्य शासनाकडून या रस्त्याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आमदार झाल्यानंतर महेश बालदी यांनी सर्वप्रथम या रस्त्याकडे विशेष लक्ष दिले. या संदर्भात त्यांनी थेट केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार या रस्त्याचा विकास केंद्रीय रस्ते विकास निधीतून होणार आहे. अशा प्रकारे भाजप, केंद्र सरकार व आमदार महेश बालदी यांनी चालक आणि प्रवाशांना नववर्षाची सुखद भेट दिली आहे.

## राज्य परीक्षा परिषदेची वेबसाईट हॅक

**मुंबई** : राज्य परीक्षा परिषदेची वेबसाईट हॅक झाली आहे. वेबसाईट हॅक झाल्यानंतर पाचवी आणि आठवीतील शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थ्यांची यादी समाजमाध्यमांत व्हायरल झाली. दरम्यान, शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांची कोणतीही यादी अद्याप आम्ही प्रसिद्ध केलेली नाही. यादी प्रसिद्ध केल्यानंतर त्या संदर्भातील माहिती दिली जाईल, असे परीक्षा परिषदेची वेबसाईट हॅक झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी सांगितले.



## १५ वर्षांवरील मुलांचे लसीकरण

# पनवेल महापालिकेची जय्यत तयारी



**पनवेल : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार पनवेल महापालिकेतर्फे १५ वर्षांवरील मुलांचे नवीन वर्षाच्या प्रारंभी लसीकरण करण्याची जय्यत तयारी करण्यात येत असून यासाठी पालिका हद्दीतील शाळांमध्ये १० पथके तयार केली असल्याची माहिती महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी गुरुवारी (दि. ३०) देऊन सहकार्य करण्याचे आवाहन पालकांना केले आहे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ वर्षांवरील (१५ ते १८ वयोगट) मुलांना कोरोना प्रतिबंधक लस देण्याचे जाहीर केल्याने पनवेल महापालिका हद्दीत लस देण्यासंबंधी चर्चा करण्यासाठी महापौर कविता चौतमोल यांनी गुरुवारी आपल्या दालनात बैठक बोलावली होती. या बैठकीला सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग सभापती समीर ठाकूर, अनिता पाटील, सुशीला घरत, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, नगरसेविका रूचिता लोंढे, नेत्रा पाटील, उपायुक्त सचिन पवार, आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. मुजावर उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिका हद्दीत मुलांच्या लसीकरणासाठी उपाययोजना करण्याबाबत सांगितले असल्याने आजची बैठक बोलवल्याचे सांगून महापौर डॉ. कविता चौतमोल म्हणाल्या की, कोरोना पुन्हा वाढू लागला असल्याने महापालिकेतर्फे नवीन वर्षाच्या प्रारंभी ३ जानेवारीपासून इयत्ता आठवी ते बारावीतील मुलांना (सन २००७ पासून जन्म झालेल्या) शाळेमध्ये कोरोना प्रतिबंधक लस देण्यात येणार आहे. जास्तीत जास्त पालकांनी आपल्या मुलांच्या आरोग्यासाठी त्यांना लस देण्याकरिता शाळेला परवानगी द्यावी.

उपायुक्तांनी सांगितले की, १५ ते १८ वयोगटातील मुलांना कोरोना लस देण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाच्या मदतीने २३० शाळांमध्ये जाऊन लसीकरण करण्यात येणार आहे. या अनुषंगाने १० पथके तयार करण्यात आलेली असून प्रत्येक पथकात एक डॉक्टर असणार आहे. याशिवाय एक रुग्णवाहिका असेल. दररोज १० शाळांमध्ये लसीकरण करण्यात येणार आहेत. पनवेल महापालिका हद्दीत सुमारे ४० हजार मुले आहेत. त्यांच्या पालकांनी ऑनलाइन नोंदणी करावी. शाळा बंद झाल्यास जवळच्या शाळेत लस उपलब्ध करून देण्यात येईल.

**पनवेल महापालिकेतर्फे १५ वर्षांवरील मुलांचे कोरोना लसीकरण ३ जानेवारीपासून करण्यात येतेय हा चांगला निर्णय आहे. शाळेतील मुलांच्या बाबतीत अनेक पालक सेन्सेटीव्ह असतात. त्यामुळे या लसीकरणाला विरोध होऊ शकतो. म्हणून मुलांची जबाबदारी शाळांनी घेऊन लसीकरणासाठी पालकांची संमती घ्यावी किंवा त्यांना ऑनलाइन नोंदणी करायला सांगावे.**

**-परेश ठाकूर, सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका**



**पनवेल : येथे प्रथमच ऋतूजा म्हात्रे-महामुनी यांनी श्री समर्थ कृपा काजू प्रोसेसिंग या नावाने काजू उद्योग सुरू केला आहे. त्याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची गुरुवारी भेट घेत आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ऋतूजा म्हात्रे-महामुनी यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी 'रयत'च्या माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य संजीवनी म्हात्रे व अन्य उपस्थित होते.**





**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे केळवणे पं. स. विभागीय उपाध्यक्ष सुबोध ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप वावंजे विभागीय अध्यक्ष रवींद्र पाटील आणि पोलीस कर्मचारी उपस्थित होते.**



**पनवेल : नगरसेविका दर्शना भोईर यांनी नांदगाव गावाच्या समोरील रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात यावे, अशी मागणी केली होती. या संदर्भात त्यांनी संबंधित खात्याकडे निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात आले आहेत.**

## पनवेल कोळीवाड्यातील विकासकामांचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून अनेक विकास कामे सुरू आहेत. त्यानुसार प्रभाग क्रमांक १९ मधील पनवेल कोळीवाड्यातील मच्छी मार्केटचे पत्रे बदलण्याचे तसेच फॉल सिलिंगचे काम ४५ लाख ४३ हजार रुपयांचा निधी वापरून करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ३०) करण्यात झाले.

या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, पंच कमिटीचे हरिचंद्र भगत, दत्ता पाटील, एकनाथ भोईर, प्रमोद भगत, तसेच आप्पा शिंदे आणि मंगेश पिलविळकर आदी उपस्थित होते.

दरम्यान, परेश ठाकूर यांनी मच्छी मार्केटची पाहणी करून आवश्यक त्या सूचना केल्या.





**पनवेल : श्री गणेश व श्री कृष्ण मूर्ती प्रतिष्ठापना वर्धापन दिन आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन विहीघर येथे करण्यात आले आहे. या ठिकाणी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी गुरुवारी भेट दिली. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, नेरा जि. प. अध्यक्ष सुनील पाटील, महादेव पाटील, सागर पाटील आदी उपस्थित होते.**

## भाजप नेते विनोद घरत यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन








**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप युवा मोर्चाचे खारघर तळोजा मंडल अध्यक्ष विनोद घरत नववर्ष २०२२ची दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ३०) प्रकाशन करण्यात आले.

भाजप रायगड उपजिल्हा प्रमुख वासुदेव घरत आणि खारघर तळोजा मंडल युवा मोर्चाचे अध्यक्ष विनोद घरत यांच्या माध्यमातून नागरिकांच्या सोईसुविधांसाठी वर्षभर अनेक सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असतात. त्याचाच एक भाग म्हणून नागरिकांना नववर्षाची भेट म्हणून विनोद घरत यांनी २०२२ची दिनदर्शिका प्रकाशित केली आहे.

या दिनदर्शिकेच्या प्रकाशनावेळी भाजप नेते प्रभाकर जोशी, जयदास तेलवणे, प्रमोद पाटील हरिचंद्र जोशी, राजेंद्र घरत, सुमित शाह, इशाक शेख, अजित सोचा, जावेद शेख, प्रेम कुमार, शुभ पाटील, पाठक जी भवन सिंग आदी उपस्थित होते.

दरम्यान, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि पं. स. सदस्य भुपेंद्र पाटील यांनी विनोद घरत यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ

माहितीसाठी

### पनवेल महानगरपालिका हद्दीत शुक्रवार, दि. ३१ डिसेंबर २०२१ रोजी होणारे

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आय. टी. एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
६. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे

*पहिल्या सहा आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
८. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
९. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१०. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
११. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
१२. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१३. सेंट्रल रेल्वे, पनवेल

### कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. काळण समाज हॉल, पनवेल ■ ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- टेंभोडे, रा.जि.प. शाळा
- भोईरपाडा रा.जि.प. शाळा
- देवीचापाडा, रा.जि.प. शाळा
- फणसवाडी
- हैदरवाडी मंदिर
- तोंडरे वरचा पाडा, रा.जि.प. शाळा
- पेठाली, रा.जि.प. शाळा
- भिंगारी, रा.जि.प. शाळा
- फुडलँड कातकरीवाडी
- नागझरी, रा.जि.प. शाळा


पान १ वरून

## ८५ आरोपींविरुद्ध पुरावा गोळा करण्याचे काम सुरू

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या आदेशान्वये जिल्हा विशेष लेखा परीक्षक यांनी लेखापरीक्षण करून कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या लेखा परीक्षणामध्ये बँकेचे अध्यक्ष, संचालक व पदाधिकारी यांनी संगनमताने केलेल्या विनातारणी, गैरविनियोग व गैरव्यवहारामुळे सभासद, बँकेचे ठेवीदार व खातेदार यांच्या ठेवी धोक्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० तसेच भारतीय दंड संहितेनुसार गुन्हा दाखल करण्याची जिल्हा विशेष लेखा परीक्षक यांनी शिफारस केली आहे. त्यानुसार कर्नाळा नागरी सहकारी बँक, पनवेल (ता. पनवेल जि. रायगड) चे अध्यक्ष व संचालक यांच्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ७८/२०२० भा.दं.वि. कलम ४०९, ४१७, ४२०, ४६३, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ सह सहकारी संस्था अधिनियम कलम १४७ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल केलेल्या गुन्ह्यात ६७ बनावट कर्ज प्रकरणांची व्याजासह रक्कम ५४३,६१,४९,३७२ रुपये अशी आहे. नमूद गुन्ह्यातील एकूण ठेवीदार ५०,६८९ असून त्यांची एकूण ठेव रक्कम ५२९,७२,४०,८७९.९३ रुपये आहे.

कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे ठेवीदार ५०,६८९ असून त्यांचे केवायसी कागदपत्र प्राप्त करण्याचे, त्यांची यादी बनविण्याचे काम सध्या बँक व्यवस्थापनाकडून सुरू आहे. फिर्यादीतील ७६ व निष्पन्न ९ असे एकूण ८५ आरोपींविरुद्ध पुरावा गोळा करण्याचे काम सुरू आहे. कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष, संचालक-पदाधिकारी यांच्या स्थावर व जंगम मालमत्ता याची माहिती घेऊन महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ अंतर्गत ही मालमत्ता गोठविण्याकरिता अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव रायगड जिल्हाधिकारी, अलिबाग यांच्याकडून शासनास प्राप्त झाला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्याबाबतची पडताळणी करून अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे, असेही गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे.

## जगदिश गायकवाड यांच्या 'भीमालय'चे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे कोकण अध्यक्ष, पनवेल महापालिकेचे माजी उपमहापौर तथा स्थायी समितीचे विद्यमान सदस्य जगदिश गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि. २९) त्यांनी कामोठे येथे 'भीमालय' हे जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी गायकवाड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग समिती ड सभापती सुशीला घरत, नगरसेवक अनिल भगत, डॉ. अरुणकुमार भगत, नितीन पाटील, ॲड. मनोज भुजबळ, विजय चिपळेकर, अजय बहिरा, विकास घरत, बबन मुकादम, नगरसेविका विद्या गायकवाड, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, युवा नेते हॅप्पी सिंग यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते यांनीही या वेळी जगदिश गायकवाड यांचे अभीष्टचिंतन केले.




## निवडक

### घरातून मोबाइलसह ऐवजाची चोरी

**पनवेल :** घरातील सदस्य झोपलेले असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घरामध्ये प्रवेश करून अ‍ॅड्राईड फोन व इतर साहित्य चोरून नेल्याची घटना आसुडगाव परिसरात घडली आहे. मुन्नाकुमार वली राम (वय ४३, रा. सेक्टर ४, आसुडगाव) हे घरात झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने राहत्या घराच्या भिंतीला असलेली सिमेंटची खिडकी काढून त्यावाटे घरामध्ये प्रवेश केला. त्याने घरात असलेला अ‍ॅड्राईड फोन व इतर साहित्य असा मिळून जवळपास १८ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### नवी मुंबईत इमारतीचा सज्जा कोसळला



**नवी मुंबई :** सिवूड सेक्टर ४६ मधील सिडकोच्या मानसरोवर सोसायटीत एका इमारतीचा सज्जा कोसाळण्याची घटना बुधवारी सकाळी घडली. या घटनेत सज्जाखाली पार्क केलेल्या दुचाकीचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने कोणासही दुखापत झालेली नसली तरी रहिवाशी जीव मुठीत घेऊन जगत आहेत. हा सज्जा पडल्यावर त्या आवाजाने आहव नागरिक धावत आल्याचे प्रत्यक्षदर्शीनी सांगितले. सिडकोच्या अधिकाऱ्यांनी येऊन या इमारतीची पाहणी केली.सिडकोच्या या इमारतींचे प्लॅस्टर सिडकोने दुरुस्त करून द्यावे अशी मागणी वाढत आहे. त्याबाबत सर्वपक्षीयांनी वारंवार आवाज उठवला आहे.

# उरणच्या आदिवासी वाड्यांमध्ये सुविधांचा अभाव

## वनविभागाकडून विकासात अडथळा; स्थानिकांचा आरोप

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

उरण तालुक्यात झपाट्याने औद्योगिकरण होत आहे. जेएनपीटी, ओएनजीसी, बिपीसीएल असे अनेक प्रकल्प तालुक्यात असूनही उरणच्या आदिवासी वाड्या अविकसित असल्याचे प्रत्यक्ष पाहणीनंतर दिसून येत आहेत. राज्य शासनाच्या धोरणानुसार गाव तिथे रस्ता असताना शासनाच्या वनविभागाकडूनच विकासासाठी अडथळा निर्माण होत असल्याचे आदिवासी बांधवांकडून सांगितले जात आहे.



उरणचे दोन भाग आहेत एक आहे पश्चिम आणि दुसरे आहे पूर्व.पूर्व भाग हा ग्रामीण भाग म्हणून ओळखला जात आहे. या भागामध्ये डोंगर भागात आदिवासी वाड्या वसलेल्या आहे. पुनाडेपासून ते जांभुळपाडा रानसई परिसरात आदिवासी वाड्या वसलेल्या आहेत.आदिवासी वाड्यामधील रानसई ग्रामपंचायत परिसरामध्ये सहा आदिवासी ठाकूर वाड्या आहेत. खैरकाठी, मार्गाची वाडी, बंगल्याची वाडी, सागाची वाडी, खोंड्याची वाडी, भुऱ्याची वाडी, साधारणपणे सहा वाड्यामध्ये १२७६ लोकसंख्या आहे. त्यामधील ८२५पेक्षा जास्त मतदान आहे. वाड्यामध्ये विकासाच्या नावांनी बोंबाबोंब आहे.

रस्ते झालेले नाहीत ह्या वाड्यांपर्यंत जाण्यासाठी पनवेल तालुक्यातून रस्ता आहे आणि उरणच्या टाकीगाव येथून ही रस्ता आहे. शासनाच्या मुख्यमंत्री सडक योजनेतून रस्ता मंजूर आहे, परंतु वनविभागाच्या खोड्यामुळे फक्त खडीकरण झाले आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. भाजीपाला लावून उदर निर्वाह चालविला जातो, परंतु वाहतूकीसाठी मोठी पायपीट करावी लागत आहे.

खरे पाहता रानसई धरण हा या वाड्यांच्या उशाशी आहे, पण आदिवासी बांधवांच्या कोरड घशाशी आहे. प्रत्येक वाडीमध्ये विहीर आहे, परंतु ह्यांचे पाणी शेवटपर्यंत शिल्लक राहत नाही.

सोलरद्वारे पाणी ही विहिरीतून पाणी शुद्धीकरण केंद्रापर्यत पोचविले गेले होते, परंतु विहरीतच पाणी शिल्लक राहत नसल्याने ते असूनही नसल्यासारखे आहे. त्यामुळे पाण्यावाचून वणवण भडकावे लागत आहे. हेटवणे धरणातून पाईपलाईनद्वारे पाणी मिळावा या साठी नागरिकांकडून मागणी होत आहे.

चिरनेर ग्रामपंचायत हद्दीमध्ये पाच वाड्या आहेत त्यामधील केलाचा माळ ही एक वाडी आहे. साधारणपणे ४५ कुटुंब या वाडीमध्ये वास्तव्य करीत आहेत १७५ लोकसंख्या असून १२५ मतदान आहे. या वाडीसाठी जाण्यासाठी रस्ता मंजूर होऊनही पूर्णत्वास येत नाही. त्यामुळे येथील नागरिकांना पायपीट करून जावे लागते पिण्याच्या पाण्यासाठी त्यांना वणवण भडकावे लागत आहे. बोरींग आहे, तर त्याला पाणी नाही. विहीर आहे, तर त्या विहिरीला पाणी पुरत नाही. उन्हाळ्यात टँकरद्वारे पाणी मागवावे लागते. लाईट वाचून त्यांना चार चार दिवस राहावे लागत आहे. पाणी लवकर मिळावा आणि रस्ता लवकर बनविण्यात यावा, अशी येथील आदिवासी नागरिकांची मागणी आहे.

चिरनेरच्या चांडायली आदिवासी वाडीवर तर लाईटच नाही. पाणी, शिक्षण रस्ते असे अनेक प्रश्न शिल्लक राहिले आहे. हाताला काम मिळत नसल्याने घरखर्च कसा चालवावा हा ही प्रश्न निर्माण होत आहे. उरणचा विकास झपाट्याने होतोय, शासनाच्या दुर्लक्षामुळे येथील आदिवासी जनतेला मूलभूत गरजांपासून वंचित राहावे लागत असल्याची मोठी शोकांतिका आहे.

> **आमच्या वाडीत लाईट आम्हाला कधीच बघायला मिळाली नाही. वाडीवर शाळाही नाही. पाणी वर्षानुवर्षे विहिरीचे प्यावे लागत आहे. जर आम्हाला या काही महिन्यात या सुविधा मिळाल्या नाही तर आम्ही यापुढे वाडीतील एकही व्यक्ती मतदान करणार नाही.**
> **–भरत कातकरी, चांडायली वाडी अध्यक्ष**

> **कोणत्याही विकासासाठी रस्ते होणे गरजेचे आहे. ह्या वाड्यावर येण्यासाठी रस्ते मंजूर आहेत, परंतु वनविभागाच्या खोड्यामुळे हे राहिले आहे. आणि पाण्याचा ही मोठी समस्या आहे. ती पूर्ण झाली पाहिजे.**
> **–व्ही. आर. म्हात्रे, ग्रामसेवक, रानसई ग्रामपंचायत**



**खारघर : कोरोना व ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर नगरसेवक अभिमन्यू धर्मा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुर्बी गावात शाळेच्या पाठीमागील नाल्यांमध्ये व सेक्टर १९मध्ये धूर आणि एमएलओ ऑइल किटकनाशक फवारणी करण्यात आली. या वेळी पनवेल महापालिकेचे अधिकारी धनंजय म्हात्रे, अतुल मोहकर, विश्वास पाटील आदी उपस्थित होते.**

## पनवेल महापालिकेतर्फे स्विप २०२१ अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल व आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या निवडणूक विभागातर्फे मतदार साक्षरता, नोंदणी व जनजागृती उत्सव स्विप २०२१ अभियान राबविण्यात आले. या अभियानात उल्लेखनीय काम करणाऱ्या सदस्यांचा सन्मान सोहळा गुरुवारी (दि. ३०) सकाळी वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आला.



या वेळी जाणीव एक सामाजिक संस्थाचे प्रसाद हनुमंते यांनाही गौरविण्यात आले. हा पुरस्कार पनवेल तहसीलदार विजय तळेकर, महापालिका उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त (मुख्यालय) विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, निवडणूक विभाग प्रमुख सदाशिव कवठे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या अभियानाची संपूर्ण ज्यांच्यावर जबाबदारी होती असे विजय चव्हाण यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अदिती मराठे यांनाही या वेळी गौरविण्यात आले.



**पनवेल : शेलघर येथील आदिवासी वाडीवर जाण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शेष फंडातून मंजूर झालेल्या निधीतून रस्ता बनविण्याच्या कामाचे भूमिपूजन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी जिल्हा परिषद सदस्य रवींद्र पाटील, माजी पंचायत समिती सदस्य रघुशेठ घरत, गव्हाण ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, शेलघर गाव अध्यक्ष अमृत भगत, ग्रामस्थ सुहास भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, सदाशिव भगत, अविनाश भगत, प्रल्हाद भगत यांच्यासह आदिवासी पाड्यावरील बांधव, भगिनी उपस्थित होते.**

## खारघरमध्ये मतदार ओळखपत्राचे वितरण

### नगरसेवक अ‍ॅड. नरेश ठाकूर यांच्या मागणीला यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील नवीन मतदारांचे तयार झालेले स्मार्ट कार्ड तहसीलदार कार्यालयात उपलब्ध आहेत हे समजताच नगरसेवक अ‍ॅड. नरेश ठाकूर यांनी मतदार ओळखपत्राचे वितरण करण्यासाठी खारघरमध्ये कॅम्प लावण्याची मागणी पनवेल तहसीलदारांना निवेदनाद्वारे केली होती. या निवेदनाची दखल घेत गुरुवारी (दि. ३०) खारघरमध्ये मतदार ओळखपत्राचे वितरण करण्यास सुरुवात झाली.



खारघरमध्ये मतदार ओळखपत्राचे वितरण करण्याच्या उपक्रमात बेलपाडा गाव प्रभाग क्र.५ मधील विठ्ठल मंदिर व गोखले हायस्कूल सेक्टर १२ येथे तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांना ओळखपत्रे वितरीत करण्यास नेहमीप्रमाणे भाजप नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून मदत केली.

या वेळी नगरसेवक नरेश ठाकूर, शत्रुघ्न काकडे, खारघर तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणिस किर्ती नवघरे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, उत्तर रायगड जिल्हा चिटणीस गिता चौधरी व महिला मोर्चा उपाध्यक्ष प्रतिक्षा कदम आदी उपस्थिती होते.

## कोरोना नियमांचे पालन करा; उरण नगर परिषदेकडून आवाहन

**उरण : वार्ताहर**

ओमायक्रॉनच्या वाढत्या संसर्गाच्या पार्शवभूमीवर सतर्कतेचा इशारा उरण नगर परिषदेकडून देण्यात आला आहे. ३१ डिसेंबर रोजी होणाऱ्या संभाव्य गर्दीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सूचनांचे पालन करावे. दोन दिवसांपूर्वी उरण नगर परिषदेकडून मास्क न लावणाऱ्या १० दुकानदार व ११ नागरिकांकाढून प्रत्येकी ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

दरम्यान, नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की ज्या नागरिकांनी कोरोना लसीचा पहिला तसेच दुसरा डोस घेतलेला नाही त्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी केले आहे.

## पनवेल मनपाकडून कारवाईबाबत सूचना

**पनवेल : वार्ताहर**

कोरानाचे वाढते रुग्ण पाहता आणि नववर्षाच्या पार्श्वभूमीवर विना मास्क फिरणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी पोलीस विभागाच्या मदतीने महापालिकेने पालिकेने प्रत्येक प्रभागानूसार पालिकेच्या ५० अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भात आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात नुकतीच बैठक घेण्यात आली. या वेळी आयुक्त गणेश देशमुख यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारवाई संदर्भात सूचना दिल्या.

पनवेल महापालिका अ‍ॅक्शन मोडवर राहणार असून, नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शासनाने दिलेल्या आदेशांचे पालन न करणाऱ्या नागरिकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. नवीनवर्षाच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम मर्यादित प्रमाणात करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यावर बंदी घालण्यात आली आहे, आदेशांचे पालन न करणाऱ्या नागरिकांवर कडक कारवाई पालिका व पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात येणार आहे. पालिकेच्या चारही प्रभागातून जवळपास ९५ हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

दरम्यान, नवीन वर्षाच्या स्वागतासाठी वनक्षेत्र परिसरात पार्ट्या करताना कोणी आढळल्यास घटनास्थळावरील साहित्य हस्तगत करून त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात येतील. तरी नागरिकांनी अशा पार्ट्या टाळाव्यात, असे आवाहन कर्नाळा वन परिक्षेत्र अधिकारी एन.डी.राठोड यांनी केले आहे.

## ‘हास्यजत्रा’च्या कलाकारांनी चाखली पोपटीची लज्जत



**पनवेल : वार्ताहर**

थंडीच्या मोसमामध्ये पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यामध्ये पोपटी पार्टी करणे ही परंपरा आहे. याची अनेकांना भुरळ पडली असून अनेक ठिकाणच्या फार्म हाऊस आणि शेतामध्ये या पोपटी पार्ट्या होत असतात. अशाच प्रकारे पेण येथे सुद्धा हास्य जत्रेतील कलाकारांची नुकतीच पोपटी पार्टी झाली.

रायगडमधील लोक हे खाण्याच्या बाबतीत हौशी म्हणून ओळखले जात असून मुंबई बरोबरच रायगडमध्ये थंडीची चाहूल लागली असल्याने खवय्यांचे पाय आता ग्रामीण भागात फार्म हाऊस आणि शेताकडे वळू लागले असून वालाच्या शेंगा बाजारात विक्रीसाठी दाखल झाल्याने ग्रामीण भागात पोपटी पार्टीला सुरुवात झाली आहे. पोपटीची भुरळ ही महाराष्ट्राची हास्य जत्रेतील कलाकारांना सुद्धा लागली असून पोपटीची चव चाखण्यासाठी हे रतिमहारथी पेण येथील नंदू कल्याणकर यांच्या फार्महाऊसवर अवतरले होते.

या वेळी अभिनेत्री विशाखा सुभेदार, अभिनेता पॅडी कांबळे, संगीतकार अमीर हडकर, चेतना भट, रसिका वेंगुर्लेकर, वनिता खरात, लेखक विनायक पुरुषोत्तम, गीतकार मंदार चोळकर, निखिल बने, वादक किशोर मोहिते, सुनील जाधव, श्याम बांगर, साहिल रेळेकर, आशिष महाडिक, गायिका मोनल कडलक, पोपटी शेफ प्रशांत शेडगे, दिग्दर्शक अनिरुद्ध शिंदे, वर्षा हडकर, कस्तुरी रेळेकर तसेच कल्याणकर कुटुंबिय हे त्यावेळी उपस्थित होते.

## नवी मुंबईत पथनाट्य, चित्रकला स्पर्धांद्वारे स्वच्छतेविषयी जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ’स्वच्छ सर्वेक्षण २०२२–पथनाट्य स्पर्धा’ व ’स्वच्छ सर्वेक्षण २०२२–खुली चित्रकला स्पर्धा’ राबविण्यात आली. यामध्ये २० पथनाट्य समुहांनी सहभागी होत स्वच्छतेचा जागर केला. तर विविध वयोगटाच्या २५ स्पर्धकांनी सहभागी होत चित्रांमधून नवी मुंबईचे स्वच्छ, सुंदर रूप साकारले.

व्हिक्टरी व्हिजन फाऊंडेशनच्या सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या या पथनाट्य स्पर्धेचे परीक्षण नाट्कर्मी रविंद्र वाडकर आणि सुनील तांबे यांनी त्या–त्या ठिकाणी जाऊन केले. दरम्यान, वाशी सेक्टर १७ येथील माँसाहेब मिनाताई ठाकरे उद्यानात आयोजित करण्यात आलेल्या ’स्वच्छ सर्वेक्षण २०२२ – खुली चित्रकला स्पर्धा’ यामध्ये विविध वयोगटाच्या २५ स्पर्धकांनी सहभागी होत चित्रांमधून नवी मुंबईचे स्वच्छ, सुंदर रूप साकारले.


**पनवेल महानगरपालिका**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ११ व कराधाननियम ८, अन्वये ५ (पाच) वर्षाकरीता सुधारित कर आकारणीची प्राथमिक यादी जाहीर प्रसिद्धीबाबत सूचना नोटीस.**

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय ‘‘अ’’, प्रभाग समिती कार्यालय ‘‘ड’’, अंतर्गत वाढीव हद्दीतील ग्रामपंचायत व गट ग्रामपंचायत तळोजा पाचनंद, रोहिंजन, फरशीपाडा, मोठा खांदा, धाकटा खांदा मधील सर्व मालमत्ता धारकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविणेत येते की,

आपल्या भोगवट्यातील इमारतीची व भुखंडाचे तपासणी व करमुल्यांकन करून महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ मधील कराधान नियम ९ अन्वये पनवेल महानगरपालिकेने दि.०१ ऑक्टोबर २०१६ पासून ते सन २०२१–२२ या पाच वर्षांकरीता इमारतीचे व भुखंडाचे कर निर्धारणाकरीता करमुल्यांकन याद्यांची प्रसिद्धी दि. ३१/१२/२०२१ रोजी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ कराधान नियम क्र.१५ अन्वये प्रारूप करमुल्यांकन यादी व मालमत्ता निहाय करमुल्यांकन प्रकरणे जाहीर प्रसिद्ध केली आहे. तसेच प्रत्येक करदात्यास विशेष नोटीस वैयक्तिक स्तरावर बजावण्यात आले आहेत व जाहीर प्रसिद्ध केलेली प्रारूप करमुल्यांकन यादी १) तळोजा पाचनंद, फरशीपाडा करिता स्थळ :– ’प्रभाग समिती ‘‘अ’’ सेक्टर १३ प्राथमिक शाळेजवळ, पूर्वाश्रमीचे ग्रामपंचायत कार्यालय खारघर, पनवेल, २) रोहिंजन करिता स्थळ :– ’प्रभाग समिती (’अ’) उपविभाग कार्यालय नावडे, नावडे गाव कमानी जवळ जुने नावडे ग्रामपंचायत’ ३) मोठा खांदा, धाकटा खांदा करिता स्थळ :– ’प्रभाग समिती (’ड’) श्री. विलासराव देशमुख कॉम्प्लेक्स, श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक पनवेल’ या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहेत.

या बाबत आपल्या इमारतीचे किंवा जागेचे, करयोग्य मूल्य अथवा करआकारणी, क्षेत्रफळ तसेच मालकी हक्क इ. बाबत आपली काही हरकत असल्यास कारणासह लेखी अर्जाद्वारे उपायुक्त (मालमत्ता कर) पनवेल महानगरपालिका तसेच online हरकत नोंदविण्यासाठी ई–मेल –pmc.tax2016@gmail.com यांच्या कडे यादी प्रसिद्ध केल्यापासून २१ दिवसाच्या आत किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेस वरील ठिकाणी हरकत नोंदवून पोचपावती घ्यावी. वरील मुदतीत लेखी हरकत / ई–मेल वर हरकत अर्ज प्राप्त न झाल्यास सदर आकारणी आपणास मान्य आहे असे गृहीत धरून करआकारणी प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच उपरोक्त प्रमाणे सुधारित करमूल्यांकनाबाबत आपण हरकत न नोंदविल्यास अथवा सुनावणी हरकत नियमाला धरुन नसल्यास सुनावणी अंती सुधारित चालू मागणी व सर्व मालमत्तांची सन २०१९–२० पर्यंत वसुली व थकबाकी यांचे समायोजन करुन सर्व मालमत्ताधारकांना सन २०२०–२१ करीता सुधारीत देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ नियम ३०, ३९ व ४० शास्तीसह यानंतर बजावण्यात येईल.

टिप :– वरीलप्रमाणे कुठल्याही मालमत्ता धारकांना / भोगवटा धारकांना हरकत नोंदवायची असल्यास सदर लेखी अर्जा/Online (Pdf Copy) सोबत पुढील नमुद दस्ताऐवज जोडणे आवश्यक आहे.

१. आक्षेप संबंधित मुद्दे निहाय आक्षेप अर्ज.
२. मालमत्ते संबंधात मालकी हक्कांचे दस्ताऐवजाची स्वसाक्षांकित प्रत. (मालमत्तेची नोंद मनपा रेकॉर्डमध्ये नसल्यास)
३. सुधारित कर मूल्यांकन नोटीसची छायाप्रत.
४. यापूर्वी कर आकारणी झाली असल्यास मागील वर्षीचा कर भरणा केल्याची पावती.

**संपर्क अधिकारी :**
१) वंदना गुळवे (सहा–आयुक्त)
२) सुनिल मानकामे (विभाग प्रमुख–मालमत्ता कर विभाग)
भ्रमणध्वनी क्र :– १८००–५३२०–३४०
फोन नं. ०२२–२७४५८०४०/४१/४२
ई–मेल – pmc.tax2016@gmail.com

**सही/–**
**(गणेश देशमुख)**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE No.06/2021-22**

The Superintending Engineer (Civil) EHV CCCM Circle, Airoli on behalf of MSETCL (the employer) hereby invites SRM E-tender mentioned below from registered contractors of appropriate class with central or State Govt. /Semi Govt. Department/ PSU and also registered under M.S.E.T.C.L.'s SRM E-Tender registration system on Mahatransco SRM E-Tendering Website.

| Sr.No. | RFx No. | Name of work |
|---|---|---|
| 1 | 7000021729 | Metal spreading, earthing water supply line, P/L RCC Cable trench covers at 220 KV Substation Tambati. ---------1st extension |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in (Guest User)**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm.):
Phone No. (022)-27601622 / Mob. No. 9769006183.
**Superintending Engineer (Civil), Airoli**

## संपादकीय

# चिंताग्रस्त वर्षाची अखेर

**महाराष्ट्र आणि मुंबईत गेल्या आठवड्याभरापासून पुन्हा एकदा लक्षणीय रुग्णवाढ दिसू लागली आहे. अर्थात या रुग्णांमध्ये डेल्टाचे बाधित किती आणि ओमायक्रॉनचे बाधित किती हे इतक्यातच सांगणे अवघड आहे. ओमायक्रॉनची बाधा आहे किंवा नाही हे ओळखण्यासाठी जनुकीय तपासणी किंवा जेनोम सिक्वेन्सिंग तंत्राची गरज भासते. या चाचणीस सध्या तरी बराच वेळ लागतो. काहीही असले तरी कोरोनाचा विषाणू पुन्हा एकदा डोके वर काढू लागला आहे एवढे निश्चित.**

दोन वर्षांपूर्वी म्हणजे २०१९च्या डिसेंबर महिन्यात चीनमध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण आढळला होता असे मानले जाते. हा घातक विषाणू जगभर हाहाकार माजवणार याचा अंदाज तेव्हाच वैज्ञानिकांना आला होता, परंतु तो इतक्या भयंकर प्रमाणात असेल असे मात्र कोणालाच वाटले नव्हते. या विषाणूच्या अमंगळ सावटाखालीच २०२० साल उजाडले आणि तसेच ते भयग्रस्त अवस्थेत मावळलेदेखील. १३० कोटी लोकसंख्येच्या भारताने या काळात इतिहासातील पहिला कठोर लॉकडाऊन अनुभवला. पहिल्या लाटेने देशाचे अर्थचक्र पार मोडून गेले. त्या धक्क्यातून सावरणे अवघडच होते, कारण कोरोनाशी लढण्यासाठी वैज्ञानिक आयुधेच नव्हती. २०२१ सालात कोरोना प्रतिबंधक लस हाती आल्यानंतर अवघ्या जगाच्या जीवात जीव आला. हे साल चांगले जाईल या अपेक्षेने देशभरातील नागरिक जीव मुठीत धरून कोरोनाशी लढत राहिले, परंतु वाटले होते तसे घडले नाही. २०२१ सालीदेखील दुसऱ्या लाटेने जनजीवन विस्कळीत केले. ऑक्सिजनचा तुटवडा, रुग्णवाहिकांचे भीतीदायक भोंगे, स्मशानामध्ये अंत्यसंस्कारांसाठी ताटकळणारे मृतदेह, औषधांअभावी गमावलेले आप्तेष्ट ही सारी भयावह स्मरणचित्रे आजही पुसट झालेली नाहीत. या स्मरणचित्रांसोबतच २०२२ हे नवे वर्ष उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे. गेले काही महिने देशभरात चांगले वातावरण होते. कोरोनाचा तडाखा कमी झालेला दिसून येत होता. निवडणुकांची धामधुम, सार्वजनिक कार्यक्रम, लग्नसमारंभ असे व्यवहार बिनदिक्कत सुरू झाले होते, परंतु २०२१ साल सरता सरता ओमायक्रॉन या कोरोनाच्या नव्या अवताराने जगभर दहशत माजवण्यास सुरूवात केली. आपल्या देशातदेखील तिसरी लाट येते की काय अशी भीती आता दाटू लागली आहे. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी अनेकांनी वेगवेगळे बेत ठरवले असतील. मित्रमंडळींसमवेत मौजमजा करत ३१ डिसेंबरची रात्र जागवण्याची स्वप्ने अनेकांनी पाहिली असतील. एकंदरीत देशभराप्रमाणेच महाराष्ट्रातही उत्सवी वातावरण तयार झाले होते, परंतु थर्टी फर्स्टच्या उत्साहाला काहिसा लगाम घालणे शहाणपणाचे ठरेल अशी स्थिती ओढवली आहे. सध्याची परिस्थिती ध्यानात घेऊन सर्वांनीच काटेकोर काळजी घेण्याची आवश्यकता आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी राज्य सरकारने नवी नियमावली जारी केली असून त्याचे पालन करणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. नव्या नियमावलीनुसार येत्या ७ जानेवारीपर्यंत राज्यभर जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. समुद्रकिनारी किंवा बागेमध्ये गर्दी करू नये, फटाक्यांची आतषबाजी करू नये, तसेच नववर्षाचे स्वागत शक्यतो घरच्या घरीच करावे अशा सूचना सरकारतर्फे देण्यात आल्या आहेत. परिस्थिती काळजी करण्याजोगी नक्कीच आहे, परंतु घाबरून जाऊ नये. कारण लसीकरणासारखे अमोघ अस्त्र आता आपल्या भात्यात आहे. थोडीशी काळजी आज घेतली तर येणारे संपूर्ण वर्ष निर्वेधपणे जाईल एवढे भान ठेवावे.

# वरचा मजला रिकामा!

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा परिषदेचे (राजिप) मुख्यालय असलेली शिवतीर्थ ही इमारत केवळ प्रशासकीय इमातर नसून ती रायगडच्या राजकीय इतिहासाची साक्षीदार असलेली एक ऐतिहासिक वारसा असलेली इमारत आहे. अनेक दिग्गजांची राजकीय कारकिर्द या इमातीत घडली आहे. ही इमतारत धोकादायक असल्याचा अहवाल लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे स्ट्रक्चरल अभियंता डॉ. सचिन पोरे यांनी दिला आहे. त्यामुळे आता ही इमारत पाडावी लागणार आहे. त्यादृष्टीने इमारत खाली करण्याची कार्यवाही राजिप प्रशासनाने सुरू केली आहे. इमारत पूर्ण न पाडता चारपैकी वरील तीन म्हणजे चौथा व तीसरा मजाला रिकामा केला जाणार आहे. कोरोडो रुपये खर्च करून तयार करण्यात आलेली दालने तोडावी लागणार आहेत. ही इमारत धोकादायक असल्याचे माहीत असतानादेखील त्यात अंतर्गत सुशोभीकरणावर खर्च करण्यात आला आहे. संपूर्ण इमारत



धोकादायक असताना त्यावर खर्च करून तो वाया घालवणाऱ्या राजिपचा वरचा मजला रिकामाच आहे, असेच म्हणावे लागेल.

राजिपच्या विविध विभागांची कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी होती. ही सर्व कार्यालये एकाच इमारतीमध्ये असावीत, असे ठरविण्यात आले. इमारत कुठे असावी यावरदेखील वाद होते. जिल्ह्याचे मुख्यालय असल्यामुळे अलिबागमध्येच ही इमारत असावी, असे काहींना वाटत होते. तर मध्यवर्ती ठिकाण म्हणून



राजिपची मुख्य प्रशासकीय इमातरत पेण येथे असावी, असे काही लोक म्हणत होते. राजिपचे तत्कालीन अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांनी रायगड जिल्हा परिषदेची मुख्य प्रशासकीय इमारत अलिबाग येथे बांधण्याचा निर्णय घेताला. त्यादृष्टीने धडाडीने पावले उचलली. इमारतीचे बांधकाम १९७८ मध्ये सुरु करण्यात आले. १९८२ साली शिवतीर्थ ही इमारत बांधून पूर्ण झाली.

एक भव्य अशी ही इमारत सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या इमारतीच्या दर्शिनी भागात चित्रशिल्प लावण्यात आले. तीला शिवतीर्थ हे नाव देण्यात आले. गेली ४२ वर्षे या इमारतीतून जिल्ह्याचे कामकाज सुरू आहे. या इमातीत रायगड जिल्ह्यातील अनेक राजकीय नेत्यांची कारकिर्द घडली. रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य असलेले काही सदस्य विधानसभेत आमदार म्हणून निवडून गेले. काही विधान परिषदेचे सदस्य झाले. मंत्री झाले. या सर्वांनी आपल्या कामाचा ठसा तिथेही उमटवला. रायगड जिल्हा परिषदेत काम केल्याच्या अनुभवाचा फायदा या सदस्यांना झाला. चांगले अधिकारी येथे आले. रायगड जिल्हा परिषदेत काम केल्यामुळे हे अधिकारी राज्यात इतर जिल्ह्यात चांगले काम करू शकले. रायगड जिल्हा परिषद हे एक राजकीय विद्यापीठच आहे. त्या विद्यापीठाचे मुख्यालय म्हणजे दिमाखात उभे असलेले शिवतीर्थ.

गेली ४२ वर्ष ही इमारत उभी आहे. या प्रदीर्घ कालावधीत इमारतीच्या अंतर्गत दालनात वारंवार बदल झाले. सत्ता बदलली की, दालनांचे नूतनीकरण, अधिकाऱ्यांच्या दालनाचे नूतनीकरण होत असते. आतापर्यंत नुतनीकरणावर करोडो रुपये खर्च झाले आहेत. २०१८ साली पंचायत राज समिती रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आली होती. तेव्हा या समितीने शिवतीर्थचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यास सांगितले होते. त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या चार वर्षात अनेक दुरूस्त्या करण्यात आल्या. करोडो रुपये त्यावर खर्च करण्यात आले. मागील पाच वर्षात या




इमारतीमध्ये अंतर्गत दुरुस्तीसाठी तसेच दलानांमधील फर्नीचरसाठी जितका निधी खर्च करण्यात आला आहे, त्याच पैशात नवीन इमारत उभी राहिली असती.

जर २०१८ साली पंचायत राज समितीने या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करून घ्यायला सांगितले असताना त्यासाठी इतकी वर्षे का घालवली. अंतर्गत दुरुस्त्या करण्यासाठी इतका खर्च का केला. हे अनाकलनीय आहे.

शिवतीर्थ ही इमारत धोकादायक असल्याचा अहवाल ११ नोव्हेंबर २०२१ राजिप प्रशासनाला प्राप्त झाला. या अहवालात जिल्हा परिषदेची प्रशासकीय इमारत जुनी झाली असून, शासकीय काम करण्यास धोकादायक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. १७ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेल्या राजिपच्या सर्वसाधारण सभेत राजिपचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी शिवतीर्थ पाडावे लागणार असल्याची माहिती दिली होती. आता ही इमारत धोकादायक असल्याचा अहवाल आल्यामुळे या इमारतीत कोणतेही बांधकाम करू नये, कोणत्याही विभागाचे किंवा पदाधिकारी यांच्या दालनाचे नूतनीकरण किंवा सुशोभीकरण करू नये, अशा सूचना डॉ. किरण पाटील यांनी बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिल्या आहेत.

इमारत पूर्ण धोकादायक आहे. त्यामुळे ही इमारत पूर्ण पाडणे अपेक्षीत होते. पंरतु तसे न करता या इमारतीचे वरचे दोन मजले रिकामे करण्याचा निर्णय राजिप प्रशासनाने घेतला आहे. वाढवलेल्या चौथ्या व तीसऱ्या मजल्यावरील कार्यालये इतर इमारतींध्ये हलविण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. ही कार्यालये इतरत्र हलविल्यास तेथे माणसांचा वावर कमी होईल. फाईली, कापाट, फर्नीचर यांचे वजन कमी होईल. दोन मजल्यांवरील वजन कमी झाल्यामुळे इमारतीवरील भार कामी होईल. त्यामुळे इमारतीला असलेल्या धोका कमी होईल, असे सांगितले जात आहे. इमारत पाडली तर ती पूर्ण पडेल. वरचे दोन मजलेच पडतील असे नाही. त्यामुळे वरचे मजले रिकामे करण्यापेक्षा शिवतीर्थ पूर्णपणे रिकामी करायला हवी. केवळ वरचे माजले रिकामे करण्यास सांगणाऱ्यांचा वरचा मजला रिकामा असावा असेच वाटते.

# ओमायक्रॉन प्रतिबंधासाठी पेण नगरपालिका सरसावली




(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेनंतर आता ओमायक्रॉन विषाणू संसर्गाचा फैलाव रोखण्यासाठी पेण नगरपालिकेच्या आरोग्य विभागाने जय्यत तयारी केली आहे. या अनुषंगाने आरोग्य विभाग अधिकारी अंकीता इसळ यांनी ८० सफाई कर्मचाऱ्यांना मास्क, सॅनिटायझर, पीपीई किट्स याबाबतीत प्रशिक्षण दिले.

एसटी स्थानक, बाजारपेठ यासारख्या गर्दीच्या ठिकाणी मास्क न लावलेल्या नागरिकांना दंड वसुल करण्यात येत असून जागोजागी दक्षता पथकाकडून तपासणी मोहीम सुरु करण्यात आली आहे. विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांकडून १५ डिसेंबरपर्यत सुमारे १५ हजार ५०० रुपयांची दंड वसुली करण्यात आली होती. त्यानंतर पून्हा धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत आरोग्य अधिकारी अंकित इसाळ, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण यांच्यासह नगरपालिका कर्मचारी सहभागी झाले आहेत.



## श्रीवर्धनमधील सीसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्त; नगर परिषदेचे दुर्लक्ष

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

निसर्ग चक्रीवादळात नादुरस्त झालेले श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे नगर परिषदेने तातडीने दुरुस्त करावेत, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

शासनाने दिलेल्या निधीतून श्रीवर्धन नगर परिषदेने शहरात ७२ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते. त्यानंतर शहरात चोरीची एकही घटना घडली नव्हती. शहरात कुठेही वाहतूक कोंडी झाली तर त्याची माहिती पोलिसांना पोलीस ठाण्यामध्ये बसूनच कळत होती. मात्र ३ जून २०२० रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे खांब व वायर्स चक्रीवादळामध्ये नादुरुस्त झाल्या. काही ठिकाणचे सीसीटीव्ही कॅमेर फुटले आहेत. दिड वर्ष पूर्ण होऊनदेखील श्रीवर्धन नगर परिषद सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करण्याकडे दुर्लक्ष करीत आहे.

# महावितरणला चार दिवसांनी जाग

## कर्जतच्या चौधरवाडीमधील अंधार अखेर दूर

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायत हद्दीतील चौधरवाडीमध्ये बैलांच्या झोंबीत चार विजेचे खांब कोसळले होते. स्थानिकांनी सतत पाठपुरावा केल्यानंतर महावितरणला जाग आली. त्यांनी नवीन विजेचे खांब उभे केल्यानंतर तब्बल चार दिवसाने चौधरवाडीमधील अंधार दूर झाला.

चौधरवाडीमध्ये ६५ घरांची वस्ती आहे. या आदिवासी वस्तीमध्ये ३० वर्षांपूर्वी विजेचे लोखंडी खांब टाकण्यात आले आहेत. त्यातील बहुतेक खांबांना गंज लागल्याने ते सडलेले आहेत. त्याबाबत तत्कालीन उपसरपंच विलास भला यांनी महावितरणकडे नवीन खांब बसविण्याची मागणी केली होती. मात्र हे खांब बदलण्यात येत नव्हते. २६ डिसेंबरच्या रात्री काही मोकाट बैलांत झोंबी झाली. ती गावातील सडलेल्या विजेच्या खांबाला धडकली. त्यावेळी बैलांच्या धडकेत चक्क विजेचे चार खांब कोसळले आणि चौधरवाडीचा वीजपुरवठा बंद झाला. स्थानिकांनी त्याबाबत महावितरणकडे तक्रारी केल्या, मात्र तीन दिवस महावितरणचा कर्मचारी चौधरवाड मध्ये पोहचला नाही. शेवटी गुरुवारी (दि. ३०) महावितरणचे कडाव येथील शाखा अभियंता विजेचे नवीन खांब घेऊन चौधरवाडीमध्ये पोहचले आणि तब्बल चार दिवसानंतर चौरवाडीचा वीज पुरवठा सुरू झाला.




(छाया : संतोष पेरणे)



# डॉ. चिंतामणराव देशमुख आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

**रोहे : प्रतिनिधी**

कोएसोच्या रोहे येथील डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय आणि सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. चिंतामणराव देशमुख आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



या स्पर्धेसाठी डॉ. सी. डी. देशमुखांचे आर्थिक विचार, कौशल्य विकास आणि युवक, कोविडोत्तर जग : आव्हाने आणि संधी, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य : काळाची गरज, ऑनलाइन शिक्षण : संधी आणि अडथळे, शेतकऱ्यांची दैन्यावस्था व पेटलेली आंदोलने आणि स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव हे विषय देण्यात आले आहेत.

या स्पर्धेचा निकाल १४ जानेवारी २०२२ रोजी घोषित करण्यात येणार आहे. तर बक्षीस वितरण समारंभ ४ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या स्पर्धेसाठी विनामूल्य प्रवेश असून स्पर्धेसाठी भाषेचे बंधन नाही. स्पर्धकांनी या स्पर्धेत व्हिडीओद्वारे आपण सहभागी व्हावे, स्पर्धकाने कोणत्याही एका विषयावर ५+२ मिनिटांचा व्हिडीओ बनवून १० जानेवारी २०२२ पर्यंत संयोजकांना या ९५२७७६५५९८ क्रमांकावर पाठवावा. एका कॉलेजमधील दोन स्पर्धकाला प्रवेश मिळेल. अशी माहिती सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टचे अध्यक्ष राजेश कापरे, प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी दिली. अधिक माहितीसाठी स्पर्धा प्रमुख डॉ. सम्राट जाधव (९९८७१५६९९६/९५२७७६५५९८) prof.samratjadhav99gmail.com./ cdcc2007gmail.com यांच्याकडे संपर्क साधण्याचा आवाहन करण्यात आले आहे.

## चौक येथे जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा जाहीर

**चौक : रामप्रहर वृत्त**

उंबरखिंड विजय दिनानिमित्त चौक येथील नेताजी पालकर मंडळाने 'नरवीर तानाजी मालुसरे-जीवन कार्य' या विषयावर रायगड जिल्हास्तरीय खुली निबंध स्पर्धा आयोजीत आहे. स्पर्धकांनी आपले निबंध २० जानेवारी २०२२ पर्यंत पोस्टाने किंवा स्वहस्ते यशवंत गोपाळ सकपाळ, ब्राम्हण आळी, मु.पो, चौक, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०६. किंवा भूषण जयवंत पिंगळे, १०, आशीर्वाद अपार्टमेंट, विठ्ठल नगर, कर्जत, ता, कर्जत, जि. रायगड, ४१०२०१ यांच्याकडे पाठवावेत.

स्पर्धेतील पहिल्या पाच स्पर्धकांना पुस्तक रुपात बक्षीस, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या उपस्थितीत २ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी १०.३० वा. विजयस्तंभ (उंबरखिंड, मु. चावणी, ता. खालापूर), येथे होणाऱ्या शासकीय कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होऊन इतिहास जागृतीच्या कार्यात सहकार्य करण्याचे आवाहन मंडळाचे संघटक यशवंत सकपाळ यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# धाटाव येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाउंडेशनच्या धाटाव येथील महिला महाविद्यालयाच्या करिअर मार्गदर्शन समिती तर्फे बुधवारी (दि. २९) विद्यार्थिनींसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात गोरेगाव पोलीस ठाण्याचे सागर गणेश कातूर्डे यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम, चालू घडामोडी, तलाठी, रेल्वे पोलीस, बँकींग इत्यादी परीक्षांसंदर्भात महत्वाची माहिती दिली.

प्राचार्य प्रा. प्रसन्ना म्हसळकर आणि महाविद्यालयातील करिअर मार्गदर्शन कक्षाच्या प्रमुख प्रा. दर्शना शिंदे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सूत्रसंचालन प्रा. हणमंत ढवळे यांनी केले. या मार्गदर्शन सत्राला प्रा. मयूर पाखर यांच्यासह १२० विद्यार्थिनी उपस्थित होत्या. आभार प्रदर्शन प्रा. नरेश घाग यांनी केले.



(छाया : महादेव सरसंबे)

# नेरळमध्ये हुतात्म्यांना अभिवादन


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्यासह गोमाजी पाटील यांनी शांत असलेल्या माणसाला जगण्याची आणि प्रसंगी आक्रमक होण्याची शिकवण दिली. त्यामुळेच माझ्याकडून स्वतःचा जीव धोक्यात घालून दुसऱ्याचे प्राण वाचविण्याची हिम्मत निर्माण झाली, असे प्रतिपादन शूरवीर मयूर शेळके यांनी गुरुवारी (दि. ३०) नेरळ येथे केले.

नेरळ येथील कोतवालवाडी ट्रस्टच्या माध्यमातून हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा बलिदान दिवस तिथीप्रमाणे साजरा केला जातो.

वांगणी रेल्वे स्थानकात स्वतःचा जीव धोक्यात घालून मयूर शेळके या रेल्वे कर्मचाऱ्याने लहान बाळाला वाचवले होते. याच मयूर शेळके यांच्या हस्ते गुरुवारी पहाट कोतवालवाडीमध्ये क्रांतीज्योत प्रज्वलित करण्यात आली. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात शेळके बोलत होते. हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्यामुळेच आपल्याला आयुष्यात संघर्ष करण्याची प्रेरणा मिळाली. त्यातून माझ्या हातून लहान मुलीचे प्राण वाचविण्याचे कार्य झाले, असे त्यांनी सांगितले.

नेरळ विद्या मंदिर, नेरळ विद्या विकास आणि कोतवालवाडी ट्रस्टमधील माजी विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर करून या वेळी हुतात्म्यांना अभिवादन केले.कोतवालवाडी ट्रस्टच्या व्यवस्थापकीय संचालक आणि जि.प. सदस्या अनसूया पादीर, नेरळच्या सरपंच उषा पारधी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेण तालुक्यातील २७ गावे आणि ३९ वाड्यांवर पाणीटंचाईचे संकट

## शहापाडा धरणात फक्त १५ दिवसांचा साठा

**पेण : प्रतिनिधी**

उत्तर शहापाडा योजनेतील २७ गावे, ३९ वाड्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या शहापाडा धरणाची पाणीपातळी खालावली असून जेमतेम १५ दिवस पुरेल एवढा पाणीसाठा धरणात शिल्लक आहे. सध्या धरणात मृत गाळयुक्त पाणी शिल्लक असून तेच पाणी पिण्यासाठी सोडले जाते.

सध्या सर्दी, खोकला या आजारांनी नागरिक त्रस्त असताना गाळमिश्रित पाणी सोडले जात असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. २०२१ वर्षाअखेरीस ही गंभीर बाब समोर आली असून, अनेक नागरिकांनी ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयाकडे तक्रारी केल्या आहेत.

पावसाळ्यात शहापाडा धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर पुढचे सात महिने या धरणातून पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यानंतर पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. २०२१ वर्षाअखेरच धरणाची पाणीपातळी १७ मीटर असून, यामध्ये गाळयुक्त मृत पाणीपातळी १० मीटर तर उर्वरित सात मीटर पाणीपातळीत गाळमिश्रित पाणी शिल्लक राहिले आहे. पुढचे १५ दिवस पुरेल एवढा पाणीसाठा धरणात शिल्लक आहे. सध्या दोन दिवसांआड पाणीपुरवठा केला जात असून, तेही गाळमिश्रित गढूळ पाणी जनतेला पिण्यासाठी सोडले जाते. त्यामुळे नव्या वर्षात पाणीटंचाईची समस्या सुरू होणार हे नक्की दिसत आहे.

**तरणखोप येथील जलवाहिनीवरून पाणीपुरवठा करण्यासाठी संबंधित सिडको अधिकारी कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला आहे. सिडकोच्या जलवाहिनीवरून लवकरच पाणीपुरवठा होईल, अशी अपेक्षा आहे.**

**–आर. एम. राठोड, शाखा अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, पेण.**

# पोलिसांकडे चांगल्या भावनेतून पहा –संजय भावसार

## खोपोलीत पोलीस कर्मचाऱ्यांचा सन्मान


(छाया : विनायक माडे)

**खोपोली : प्रतिनिधी**

अखिल भारतीय पोलीस हक्क संरक्षण संघटनेच्या वतीने उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा नुकताच खोपोलीतील ब्राम्हण सभागृहात सन्मान करण्यात आला. पोलिसांकडे सकारात्मक भावनेतून पाहिल्यास त्याच्या वेदनांची जाणीव होईल, असे मत संघटनेचे राज्याचे अध्यक्ष संजय भावसार यांनी व्यक्त केले.

खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या हस्ते गणेश पूजन करण्यात आले. या वेळी शिरीष पवार व खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अनिल विभूते यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक गुन्हे उघड केलेल्या महिला पोलीस व पोलीस बांधवांचा सन्मान करण्यात आला

जनतेची सेवा करणे हे आमचे कर्तव्यच आहे. जनतेनेही सहकार्याची भूमिका ठेवल्यास सेवा करताना अधिक सोपं जाईल तसेच चोऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रत्येक सोसायटीमध्ये सीसीटीव्ही लावण्यात यावेत, अशी सूचना या वेळी पोलीस निरीक्षक पवार यांनी केली.

संघटनेच्या राष्ट्रीय महिला अध्यक्षा किरण देशपांडे, राज्य महिलाध्यक्षा तनुजा गुळवी, ठाणे जिल्हा अध्यक्षा मेघा मोरे, रायगड जिल्हाध्यक्ष मधुकर घारे, उपाध्यक्ष निलेश विचारे, सचिव सुनिल ठाकूर, सहसचिव नितेश कदम, कोषाध्यक्ष प्रशांत गोपाळे, नगरसेवक राजू गायकवाड , नगरसेविका निकिता पवार, महिला जिल्हाध्यक्षा कविता खोपकर, स्मिता दुसाने, संतोष ठाकूर, गौरी ठाकूर, शारदा कसबे, वर्षा मोरे, आरती कुंभार, सुनेत्रा भिसे, अक्षरा चौधरी, रजनी म्हामुणकर, सुलक्षणा दाभाडे, साधना पाटील, भरत पाटील, हिरोजी देशमुख, रमाकांत म्हामूणकर, राजू रणवीर, संजय देशमुख, संजय म्हामूणकर, सोपान कालेकर, संतोष सांवत, समिश पाटील, विश्वनाथ म्हशीळकर, ॲड. तेजश्री करंजकर, भारती सणस, मानसी पवार, भारती पाटील, मंजुळा गोरे, किशोरी चेउलकर, हेमलता कर्णुक, शीतल गायकवाड यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# रोह्यात विनामास्क वावरणाऱ्यांवर कारवाई


(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**

कोरोनाने पुन्हा डोके वर काढले असून ओमायक्रॉनचे रुग्ण वाढू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर रोहा नगर परिषद व पोलीस विभागाकडून गुरुवारी (दि. ३०) बाजारपेठेत विनामास्क वावरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

कोरोना प्रादुभाव रोखण्यासाठी शासनाने कोरोना रोखण्यासाठी मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. सॅनिटायझरचा वापर करा, मास्क वापरा, गर्दी करु नका, कोरोना प्रतिबंधक लस घ्या यासह कोरोना रोखण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. परंतु काही नागरिक कोरोना नियमांचे पालन करीत नसल्यामुळे रोहा बाजारपेठेत विनामास्क वावरणाऱ्यांवर गुरुवारी रोहा नगर परिषद व पोलिस विभागाने कारवाईचा बडगा उगारला. शहरातील तीनबत्ती नाक्यापासून कारवाई करण्यास सुरूवात करण्यात आली. मास्क न वापरणारे दुकानदार, नागरिक, वाहनचालक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत नगर परिषद कर्मचारी, रोहा पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक अविनाश ढाकरे यांच्यासह पोलीस व वाहतूक कर्मचारी सहभागी झाले होते.

# पालीत जुगार अड्ड्यावर छापा

## दीड लाखाहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त, दोघे ताब्यात

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील पाली बसस्थानकाजवळ असलेल्या मटका जुगार अड्ड्यावर मंगळवारी (दि. २८) पोलिसांनी छापा टाकला. या छाप्यात तब्बल एक लाख ६७ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम तसेच दोघाजणांना पाली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पाली बसस्थानकाजवळ अवैध मटका धंदा सुरू असल्याची माहिती सहाय्यक निरीक्षक अजित साबळे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल अतुल चंदनशिव, पोलीस नाईक म्हात्रे व शेडगे यांनी तेथे छापा टाकला. यावेळी पोलिसांनी धावत जावून दोन संशयितांना पकडले. त्यांच्याकडे एक पावती बुक, पावत्या इतर साहित्य रोख रक्कम व स्कुटी मोटारसायकल मिळून आल्या आहेत.

# खालापुरात अल्पवयीन मुलीची प्रसूती; नराधमाविरोधात गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवणाऱ्या विष्णू दामू पवार (रा. बुरमाटवाडी-दांडवाडी, ता. खालापूर) विरोधात पीडितेने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. शारीरिक संबंधातून गरोदर राहिलेल्या अल्पवयीन मुलीची प्रसूतीनंतर विष्णू पवार तिला धमकावत होता.

पीडित मुलगी ही पंधरा वर्षाची असून खडकीचीवाडी रानसई येथे राहणारी आहे. विष्णू पवार हा पीडित मुलीची आई घरी नसताना तिच्या घरी येत असे. तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून विष्णू याने लग्नाचे आमिष दाखवले होते. पीडितेसोबत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. त्यातून पीडित मुलगी गरोदर झाली. विष्णू याने याबाबत कुठे वाच्यता केल्यास परिणाम वाईट होतील अशी धमकी दिली होती.

प्रसूती झाल्यानंतर लग्नास नकार देणाऱ्या विष्णू पवारविरोधात पीडित मुलीने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याबाबत विष्णू पवार विरोधात भादंवि कलम ३७६,३७६ (२) (एन) (आय),३७६(३),५०६, बाल लैंगिक अत्याचार संरक्षण (पोस्को) अधिनियम, २०१२ ४,८,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# गणपतीवाडी ते आंबेगाव रस्त्यावर दुभाजक उभारावेत –बंडू खंडागळे

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील गणपतीवाडी बायपास ते आंबेगाव रस्त्यावर लहान-मोठे अपघात होत असून याठिकाणी लवकरात लवकर दुभाजक बसवावेत अशी मागणी भाजप जिल्हा चिटणीस बंडू खंडागळे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पेण-खोपोली बायपास रस्ता हा एक्सप्रेस हायवे प्रमाणे बनल्याने या रस्त्यावरून अनेक वाहने जात असतात. यामध्ये चारचाकी, तीनचाकी प्रवासी रिक्षांचाही समावेश आहे. या रस्त्यावर गणपतीवाडीपासून आंबेगावच्या आसपास मोठ्या प्रमाणामध्ये लोकवस्ती निर्माण होत आहे. त्यामुळे छोटे-मोठे अनेक अपघात होत आहेत. ते टाळण्यासाठी गणपतीवाडी बायपासपासून आंबेगावपर्यंतच्या रस्त्यावर फायबर दूभाजक बसविणे गरजेचे आहे, खंडागळे यांनी निवेदनात म्हटले आहे. याबाबत आमदार रवीशेठ पाटील यांनासुद्धा निवेदन देण्यात येणार असल्याचे बंडू खंडागळे यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# पेणजवळ कारची संरक्षक कठड्याला धडक; एकाचा मृत्यू, पाच जण जखमी

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पेणजवळील बोरीफाटा येथे पुलाच्या संरक्षक कठड्याला मंगळवारी (दि. २८) भरधाव कारने धडक दिली. या अपघातात एकजण ठार तर पाचजण जखमी झाले.

कारचालक विशाल विलास भोईर (वय ३०) हे त्यांच्या ताब्यातील एर्टिगा कार घेऊन मंगळवारी पनवेल येथून रोह्याकडे जात होते. पेण तालुक्यातील बोरीफाटा येथील पुलाच्या कठड्याला त्यांच्या कारने जोरदार धडक दिली. या अपघातात पुढे बसलेले लक्ष्मण पवार हे गंभीर जखमी होऊन मरण पावले तर या फिर्यादी सूचिता पवार (वय २६), सविता देशमुख (वय ४९), अलका डमडेरे (वय ६०), अन्वेष भोईर (वय ५), चालक विशाल भोईर हे जखमी झाले असून, अन्वी लक्ष्मण पवार ही चार वर्षाची चिमुकली मात्र सुखरूप आहे.

या प्रकरणी चालक विशाल भोईर याच्या विरोधात वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार महेश रुईकर करीत आहेत

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

# कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**कर्जत : बातमीदार**

मुरबाड-कर्जत महामार्गावरील वाकडी पूलाजवळ भरधाव कंटेनरने दुचाकीला ठोकर दिली. या अपघातात वैभव संभाजी ऐनकर (रा. सुगवे) या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. अपघातानंतर कर्जतच्या दिशेने पळून जाताना पोलिसांनी तो कंटेनर अडवून चालक अक्षयकुमार मोर्या याला ताब्यात घेतले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेला वाणिज्य गाळा (शॉप) आमचे अशिल **सौ. कल्याणी डी.के. सिंह** यांनी सदरहू शॉपचे प्रस्थावित मालक **श्री. संजय नामदेव कदम व सौ. नंदिनी संजय कदम** यांसकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी सदर शॉपचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर वाणिज्य गाळा (शॉप)चे वर्णन खालील प्रमाणे :

**''शॉपचे (वाणिज्य गाळा) वर्णन''**

**मौजे-करंजाडे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| इमारतीचे नाव | शॉप क्र. | मजला | प्लॉट क्र. | सेक्टर | क्षेत्र चौ. फुट (बिल्ट अप) |
|---|---|---|---|---|---|
| साई पर्ल सोसायटी | ०६ | तळमजला | ए-१२१ | ६ | ९.०० चौ.मी |

तरी प्राप्त परिस्थितीत वरील वर्णनित मिळकतीमध्ये नमूद केलेल्या वाणिज्य गाळा (शॉप) वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार – मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **''७ दिवसांचे''** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदरचा वाणिज्य गाळा (शॉप) खरेदी-विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत तसेच आलेल्या तक्रारी, दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि. ३०/१२/२०२१

**सही/-**
**ॲड. प्रशांत परशुराम वाघमारे**
B.L.S.,LL.B.

पत्ता :- ऑफिस नं ११३, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, जुने पनवेल, पनवेल, जि. रायगड. ४१०२०६


# सुधागड कसईशेत येथे हनुमान मूर्तीची प्राणप्रतिष्ठा


(छाया : धम्मशील सावंत)



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील हातोंड ग्रामपंचायत हद्दीतील कसईशेत ठाकुरवाडी येथे हभप रामदास महाराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्री हनुमान मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने २५ व२६ डिसेंबर या कालावधीत प्राणप्रतिष्ठा महायज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता.

शनिवारी वास्तुपुजा, नवग्रहपूजन, होमहवन विधी, हरिपाठ, जलावास, धान्यवास असे कार्यक्रम झाले. सायंकाळी दिंडी सोहळा तर रात्री जागर भजन करण्यात आले. रविवारी मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहन, सत्यनारायणाची महापूजा, सामुदायिक हरिपाठ आणि रात्री हभप रामदास महाराज पाटील यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले.

हातोंड ग्रामपंचायतीच्या सरपंच आशाताई पाठारे व संदेश सखाराम तवले यांच्या वतीने या कार्यक्रमात महाप्रसाद देण्यात आला. आशाताई पाठारे, दत्तात्रेय सकपाळ, मंगेश वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. हनुमान मंदिरासाठी मोफत जागा उपलब्ध करून देणाऱ्या हिरू बामा शिद यांचा या वेळी हभप रामदास महाराज पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पालीचे पीएसआय राम पवार, मारुती पांगारे, उपसरपंच पंकज पाठारे, परळी ग्रामपंचायतीचे सदस्य महेश ठाकूर, रमेश विष्णू पाठारे, दत्तात्रय सपकाळ, माजी सरपंच शंकर कडू, माजी उपसरपंच अनंत भोसले, जगन्नाथ पाठारे, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर घोंगे, विठ्ठल सिंदकर, माजी सरपंच झिमा कोकरे, शाहीर दामोदर शिद, धावू हिरवा, काशिनाथ पाठारे, रमेश घोंगे, संदेश तवले यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किसन वाघमारे, रमेश वाघमारे, दिनकर शिद, मारुती हाशा निरगुडा, ताई वाघमारे, इंदु ठोंबरे यांच्यासह ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# भारताचा द. आफ्रिकेवर ऐतिहासिक विजय

## पहिली कसोटी जिंकून ‘विराटसेने’ची मालिकेत आघाडी

**सेंच्युरिअन : वृत्तसंस्था**

विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने वर्षाची अखेर आनंदी केली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारतीय संघाने ११८ धावांनी ऐतिहासिक असा विजय साकारला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. सेंच्युरियन मैदानावर भारताने कसोटी सामन्यात विजय मिळवण्याची ही पहिलीच वेळ आहे. इतकेच नाही तर ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड वगळता आफ्रिकेचा या मैदानावर पराभव करणारा भारत फक्त तिसरा देश आणि आशिया खंडातील पहिला देश ठरला आहे.



पाचव्या दिवशी भारताने दक्षिण आफ्रिकेचे सहा गडी झटपट बाद केले. दुसऱ्या डावात जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद शमी यांनी प्रत्येकी तीन, तर मोहम्मद सिराज आणि रविचंद्रन अश्विन यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. पाचव्या दिवसाचा खेळ सुरु झाला तेव्हा डीन एल्गर आणि टेम्बा बावुमा जोडी मैदानात जमली होती. मात्र एल्गर ७७ धावांवर असताना जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीवर पायचीत झाला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेला क्विंटन डिकॉक जास्त काळ मैदानात तग धरू शकला नाही. तो २१ धावा करून तंबूत परतला. डीकॉकपाठोपाठ वियान मल्डर बाद झाला. मल्डरने अवघी एक धाव केली. लगेचच मार्को जॅनसेन १३ धावा करून तंबूत परतला. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कागिसो रबाडाला आपले खातेही खोलता आले नाही. त्यानंतर लुंगी एनगिडी शुन्यावर बाद झाला आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले.

भारताने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. पहिल्या डावात भारताना सर्वबाद ३२७ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेने १९७ धावा केल्या. त्यामुळे भारताला १३० धावांची आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात भारताने सर्वबाद १७४ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी ३०४ धावांचे आव्हान दिले मात्र दक्षिण आफ्रिकेचा संघ सर्वबाद १९१ धावाच करू शकला.


दक्षिण आफ्रिकेमध्ये भारताने मिळवलेला हा फक्त चौथा कसोटी विजय ठरला आहे. त्यामुळे या विजयामुळे टीम इंडियाच्या नावे हा विक्रम नोंदवला गेला असून कर्णधार विराट कोहलीसाठीदेखील त्याच्या नेतृत्वाखाली मिळवलेला हा विजय संस्मरणीय ठरला आहे. तब्बल सात वर्षांनंतर दक्षिण आफ्रिकेने सेंच्युरियनवर कसोटी सामन्यात पराभवाचा सामना केला आहे.

# प्रो कबड्डी लीगमध्ये दिल्लीची ‘दबंगगिरी’

## गतविजेत्या बंगाल वॉरियर्सला लोळवले

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगमध्ये बुधवारी दोन सामने झाले. पहिल्या सामन्यात दिल्ली दबंगने बंगाल वॉरियर्सला एकतर्फी लोळवले, तर दुसऱ्या सामन्यात यूपी योद्धा आणि गुजरात जायंट्स यांच्यातील सामना बरोबरीत सुटला. दिल्लीने तिसरा विजय मिळवत यंदाच्या हंगामात अजिंक्य राहाण्याची मालिका कायम ठेवत अव्वल स्थानी झेप घेतली, तर यूपी योद्धाशी सामना बरोबरीत सोडवून गुजरात जायंट्सचा संघही दुसऱ्या क्रमांकावर विराजमान झाला.



दोन विजय आणि एक टाय असा प्रवास करून दिल्लीचा संघ बुधवारी गतविजेत्या बंगाल वॉरियर्ससमोर उभा ठाकला होता. आपला विजयरथ वेगाने पुढे नेत त्यांनी आक्रमक सुरुवात केली. झटपट गुण मिळवत त्यांनी बघताबघता सामन्यावर पकड मिळवली. हाफ टाईमपर्यंत दिल्लीने ३३-१५ अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धातही त्यांनी तुफान चढाई केली आणि ५२-३५ असा एकतर्फी विजय मिळवला. नवीन कुमारने एकट्याने २१ रेड पॉईंट्ससह २४ गुण मिळवत विजयात सिंहाचा वाटा उचलला.

पहिला सामना एकतर्फी झाला असला तरी गुजरात आणि यूपी योद्धा यांच्यातील सामना चांगलाच रंगतदार झाला. पूवार्धापासून ते उत्तरार्धाच्या शेवटापर्यंत सामन्यात गुणांचा फरक फारसा दिसून आला नाही. कधी गुजरात पुढे, तर कधी यूपी योद्धा पुढे हा सामना रंगला, मात्र अखेरीस दोन्ही संघ ३२-३२ अशा गुणांवर राहिले.

# आशिया कपसाठी नवी मुंबईत फुटबॉल क्रीडांगण सज्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

१७ वर्षाखालील महिला अशियाई फुटबॉल करंडक स्पर्धा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत होत आहे. या स्पर्धेच्या शुभारंभाचा आणि अंतिम सामना नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे. याशिवाय स्पर्धेचे सराव सामने नवी मुंबई महापालिकेच्या नेरूळ येथील डॉ. यशवंतराव चव्हाण फुटबॉल मैदानामध्ये होणार आहेत. या निमित्ताने आयुक्तांनी मैदानाच्या तयारीची पाहणी केली.

यापूर्वीही सन २०१७मध्ये फिफा १७ वर्षाखालील पुरुष विश्वचषक स्पर्धेचे काही सामने नवी मुंबईत खेळविण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा एकदा आशियाई स्पर्धेच्या निमित्ताने नवी मुंबई यजमानपद भूषवित आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या १७ वर्षाखालील महिला आशियाई फुटबॉल करंडक स्पर्धेच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण फुटबॉल क्रीडांगणाची व तेथील सुविधांची महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी अधिकाऱ्यांसह पाहणी केली व आवश्यक त्या सूचना केल्या.

## आरोग्य प्रहर

### शरीरातील व्हिटॅमीन ‘डी’च्या कमतरतेकडे दुर्लक्ष करू नका!

हिवाळ्यात सकाळच्या कोवळ्या किरणांमुळे फक्त शरीराला ऊब मिळते, असे नव्हे तर संपूर्ण शरीराला आवश्यक असणारी व्हिटॅमीन डीची कमी पूर्ण होते. व्हिटॅमीन डीच्या बाबतीत सांगायचे झाल्यास शरीराला मजबूत ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. शिवाय रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यास मदत होते तसेच शरीराच्या अन्य अवयवांना आजारांपासून दूर ठेवण्यास मदत होते. यामुळे नागरिकांना सल्ला दिला जातो की, रोगप्रतिकार शक्ती मजबूत करण्यासाठी काही टिप्स फॉलो करा. व्हिटॅमीन डीच्या कमतरतेमुळे रोगप्रतिकार शक्तीशी संबंधित आजाराच्या विळख्यात येऊ शकता. माहिती करून घेऊयात या आजारांविषयी...



**व्हिटॅमीन डीची लक्षणे**

याच्या लक्षणांकडे बघितले तर, प्रभावित व्यक्ती तणावात राहतो. गुडगे दुखतात, थकवा येतो. जखमेवरील घाव भरण्यास वेळ लागतो. एवढेच नाही तर त्यांचा मूड नेहमी खराब असतो. अशी लक्षणे दिसल्यास लगेच डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार करावेत.

- **सर्दी होते** : तज्ज्ञांच्या मते व्हिटॅमीन डीच्या कमरतेमुळे सर्दी होते. सर्दी ही ऋतू बदलताना दिसून येते. हा आजार साधा दिसत असला तरी कोरोना काळात याकडे संशयाने पाहिले पाहिजे.
- **बॅक्टेरीयल संसर्ग** : व्हिटॅमीन डीच्या कमतरतेमुळे बॅक्टेरीयल व्हायरसचा संसर्ग होतो. आपल्या रोगप्रतिकार शक्तीला व्हायरल आणि बॅक्टेरीयल संसर्गाशी लढाव लागते. अशात व्हिटॅमीन डीची कमतरता असेल, तर व्हायरल संसर्गासमोर रोगप्रतिकार शक्ती कमजोर पडते.
- **आजारी होणे** : व्हिटॅमीन डीची कमतरता झाल्यास रोगप्रतिकार शक्ती कमी पडते. यामुळे आजारांचा सामना करावा लागतो. व्हिटॅमीन डीची कमतरता कित्येक पद्धतीने पूर्ण केली जाऊ शकते. त्यामध्ये सर्वांत चांगला उपाय म्हणजे कोवळ्या उन्हात बसणे. शिवाय तुम्ही फळ, भाजीपाल्यांचे सेवन भरपूर प्रमाणात केले पाहिजे की, ज्यामध्ये व्हिटॅमीन डी भरपूर असते.
- **उच्च रक्तदाब** : उच्च रक्तदाबही रोगप्रतिकार शक्तीला प्रभावित करतो. अहवालानुसार, व्हिटॅमीन डीच्या कमीमुळे उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होऊ शकते. ज्या लोकांमध्ये व्हिटॅमीन डीची कमतरता राहते त्यांना टाईप दोनचा मधुमेह होऊ शकतो. मधुमेहाच्या रुग्णाची रोगप्रतिकार शक्ती खूपच कमजोर असल्याचे मानले जाते.









पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ‘रयत’च्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज प्रांगणात ‘लोकनेते रामशेठ ठाकूर भवन’ उभारले आहे. या भवनाचे उद्‌घाटन नुकतेच ‘रयत’चे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री, खासदार शरद पवार यांच्या हस्ते झाले. त्याबद्दल गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, भाजप कोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर, ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील आदींनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार केला. या वेळी अनंताशेठ ठाकूर, कमलाकर घरत, कोळी समाज तालुकाध्यक्ष उत्तम कोळी, उलवे नोड-१चे सरचिटणीस अंकुश ठाकूर, किशोर पाटील, बाबूराव कांबळे, आशिष घरत, भाऊ भोईर, अनिकेत ठाकूर, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवा मोर्चा अध्यक्ष योगेश लहाने, वारदोलीचे उपसरपंच सतीश पाटील, माजी उपसरपंच नारायण भोपी, ‘रयत’च्या माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य संजीवनी म्हात्रे आदी उपस्थित होते.












राम प्रहर

## अर्थसाक्षर प्रश्नमंजुषा

आपल्या दैनिक राम प्रहरमध्ये दर रविवारी अर्थ प्रहर सदर प्रकाशित होते. या सदरातून वाचकांना अर्थविषयक माहिती देण्यात येते. ही माहिती ‘राम प्रहर’च्या वाचकांसाठी लाभदायक ठरत असते. याच सदरात दर रविवारी आता वाचकांसाठी प्रश्नमंजुषा सुरू करीत आहोत.

‘अर्थसाक्षर’ या शीर्षकाखाली दर रविवारी प्रश्नमंजुषेमध्ये वाचकांना तीन प्रश्न विचारण्यात येतील. या प्रत्येक प्रश्नासोबत चार पर्यायी उत्तरे दिली जातील. त्यातील योग्य उत्तर वाचकांनी निवडायचे आहे. निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या 7738106009 या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

या तिन्ही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तिन्ही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील. तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com